# <u>नियमित दिवाणी दावा क्र. ४४२/२०१२ मधील नि.क्र.५८ खालील आदेश</u>

**CNR No. MHBI-1100-1704-2012**

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जाचा सारांश – प्रस्तुतचा दावा वादीने दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप करुन स्वतंत्र ताबा मिळणे करीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन असे की, प्रतिवादी यांनी मुळ दाव्याची त्यांची लेखी कैफियत सदर दाव्यात दि. २५/०३/२०१३ रोजीच दाखल केली आहेत. दावा प्रलंबीत असतांना वादी व प्रतिवादी यांचेमध्ये आपसात तडजोडीची बोलणी होऊन प्रकरण तडजोडीने व सहमतीने मिटण्याचे ठरले होते व त्याबाबतचे करारपत्र देखील वादी क्र. २ व प्रतिवादी यांनी लिहुन ठेवले आहे. तडजोडीमध्ये प्रतिवादी यांनी वादी यांना एकुण ८,५०,०००/– रुपये पोटगी रक्कम व संपुर्ण हिश्यापोटी एक रकमी मोबदला म्हणुन दोघांच्या संमत्तीने साक्षीदारांचे समक्ष देण्याचे ठरले. सदर तडजोडीपोटी प्रतिवादी यांनी वादींना रुपये ५,००,०००/– दिलेले आहेत. वादी क्र. १ व २ यांनी मोबदला रक्कम स्वीकारल्यानंतर संपुर्ण पोटगीचे हक्क सोडुन देण्याचे ठरले आहे. यासर्व बाबी प्रतिवादींना त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये जादा कलम २१/अ वाढ करुन त्यामध्ये रेकॉर्डवर आणण्यासाठी पुर्वी दिलेल्या लेखी कैफियतीमध्ये दुरुस्ती करणे आवशयक झालेले आहे. प्रतिवादींना ज्या लेखी कैफियतीमध्ये दुरुस्ती करावयाच्या आहेत त्या सर्व बाबी हया दावा दाखल झाल्यानंतर दावा प्रलंबीत असतांना घडलेल्या आहेत. करीता प्रतिवादीने अर्जात सुचविले प्रमाणे दुरुस्ती मागितलेली आहे.

**३.** वादी यांनी नि.क्र.६३ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथनांचा इन्कार केलेला आहे. वादी यांनी असे कथन केले की, बैठकीमध्ये प्रतिवादीने वादीला रक्कम रु. ८,५०,०००/– देण्याचे ठरलेले नव्हते. तशी रक्कम बँकेत जमा केलेली नाही. प्रतिवादी यांनी कथन केले प्रमाणे स्टॅम्प पेपरवर उभय पक्षांमध्ये करारपत्र झालेले नाही. तसेच ठरलेल्या एकुण रक्कमेपैकी प्रतिवादी यांनी

वादी यांना रक्कम रु.५,००,०००/- ऑनलाईन अदा केल्याचे कथन खोटे असल्याचे नमुद केले आहे. भोकरदन न्यायालयातील वादी, प्रतिवादी यांचेमध्ये प्रलंबीत असलेले तीन फौजदारी प्रकरणे प्रतिवादी यांनी करारनाम्याचे आधारे काढुन घेतल्याचे खोटे कथन केले आहे.

४. प्रतिवादी यांचेकडुन वादी यांना थकीत पोटगी रक्कम चार लाख ते साडेचार लाख रुपये येणे बाकी आहे. त्या पोटगीची रक्कम बुडवण्याच्या हेतुने प्रतिवादी यांनी दाव्यात दुरुस्ती सुचीत केली आहे. वादी प्रतिवादी यांचेमध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड झालेली नाही. केवळ प्रकरण प्रलंबीत ठेवण्याच्या उद्येशाने प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

५. प्रतिवादी, वादीतर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व त्यासोबत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. अर्ज व अभिलेखावरील कागद वाचुन पाहिले. सदरील दावा हा वादीने दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप करुन स्वतंत्र ताबा मिळणे करीता दाखल केलेला आहे. दावा पुराव्यासाठी प्रलंबीत असतांना दि. २६/१०/२०२१ रोजी वादी प्रतिवादी यांचेमध्ये स्वर्गीय आमदार विनायकरावजी मेटे यांचे घरी बैठक होऊन बैठकीमध्ये वादी यांनी प्रतिवादी यांचेकडुन एक रकमी ८,५०,०००/- स्वीकारुन कायमस्वरुपी पोटगी हक्क सोडुन देण्याचे ठरले. तसे करारपत्र वादी प्रतिवादी यांचेमध्ये पुर्ण होऊन वादी यांना प्रतिवादी यांनी ठरले रकमेपैकी रक्कम रु. ५,००,०००/- बँक खात्यातुन वर्ग केले. त्याप्रमाणे संपुर्ण प्रलंबीत न्यायालयीन प्रकरणे काढुन घेण्याचे आपसात ठरले. प्रतिवादी यांनी ठरलेप्रमाणे भोकरदन न्यायालयातील प्रलंबीत असणारे तीन फौजदारी प्रकरणे काढुन घेतली. या संपुर्ण बाबी कैफियतीमध्ये अभिलेखावर आणणेसाठी प्रतिवादी यांनी दुरुस्ती सुचवुन जादा मजकुर कलम २१/अ, मध्ये नमुद करणेची विंनती केली.

७. वादी यांनी करारपत्र, त्यांच्या मधील झालेली तडजोड बैठक तसेच करारापोटी मिळालेली रक्कम ५,००,०००/- अमान्य केली आहे. नि.क्र.६६ सोबत दाखल करारपत्राचे अवलोकन केले असता दि. २६/१०/२०२१ रोजी

उभय पक्षांमध्ये करारपत्र झाल्याचा कागद प्रतिवादी यांनी दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी यांनी त्यांचे बँक खाते उता–यातुन दि. २७/१०/२०२१ रोजी वादी यांना रक्कम रुपये ५,००,०००/– वर्ग केल्याचा शेरा दिसुन येतो. प्रतिवादी यांनी गेवराई न्यायालयातील प्रलंबीत फौजदारी प्रकरणे काढुन घेतल्याची पुरसिस न्यायालयीन आदेशासह दाखल केली आहेत.

८. दावा प्रलंबीत असतांना उभय पक्षांमध्ये झालेले तडजोडीचे अनुशंगाने करारपत्र, पैशाची देवाण घेवाण याबाबतचे बाबी न्यायालयासमोर आणणे व त्या पुरावा म्हणुन एकमेकांविरुध्द वापरणे हे मुलतः कायदेशीर नाही. प्रतिवादी यांनी त्यांच्या तडजोडीमध्ये न्यायालयाबाहेर झालेले करारपत्र व त्यामध्ये ठरलेल्या बाबी दुरुस्तीद्वारे कैफियतीमध्ये आणण्याचा प्रयत्न केला आहे. प्रतिवादी यांनी वादी यांना रक्कम रुपये ५,००,०००/– बँक खातेद्वारे वर्ग केलेचे उता–यावरुन दिसुन येते. सदरची रक्कम कोणत्या कारणासाठी कशाप्रकारे वादी यांना वर्ग झाली याचा खुलासा वादी यांनी त्यांचे म्हणणेमध्ये केलेल्या नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातुन प्रतिवादी यांना त्यांनी वादी यांना वर्ग केलेली रक्कम व त्यांचेमध्ये झालेले व्यवहार यामध्ये पारदर्शकता येणेसाठी सुचीत केलेली दुरुस्ती मंजुर करणे न्यायोचीत ठरणार आहे.

९. सदरची दुरुस्तीमुळे वादी यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही, असा युक्तीवाद प्रतिवादी यांचे वतीने सादर करण्यात आला आहे. अर्जातील मजकुराप्रमाणे नियोजित दुरुस्ती केल्यास दाव्याचा मूळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. अशा स्थितीत, दाव्याची विविधता टाळण्यासाठी व वादी, प्रतिवादींमधील वाद कायम स्वरुपी संपुष्टात आणण्याकरीता, प्रतिवादी मागणी करतात त्याप्रमाणे प्रतिवादींना कैफियतीमध्ये नियोजीत दुरुस्ती करण्यास परवानगी देणे जरुरीचे वाटते. सबब दावा गुणानुगुणांवर निकाली काढण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## आ दे श

१. प्रतिवादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीस नियोजीत दुरुस्ती प्रमाणे कैफियत दुरुस्ती करण्यास

परवानगी देण्यात येत आहे.

३. प्रतिवादी यांनी सदरची दुरुस्ती प्रस्तुत आदेशापासुन १४ दिवसांचे आत करणेची आहे व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करणेची आहे.

Nilesh Ashokrao Randive 2024.02.09 17:53:43 +0530

**दिनांक – ०९/०२/२०२४** **( एन. ए. रणदिवे )**
**गेवराई.** **२ रे सह दि.न्या. क. स्तर, गेवराई.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 09-02-2024 |
| Transcribed on | :- | 09-02-2024 |
| Checked & Signed on | :- | 09-02-2024 |

Sd/-
(S.D. Shinde)
Stenographer G-3, Georai.